महाराष्ट्र प्राचीन स्मारके, पुराणवस्तुशास्त्र विषयक
स्थळे व अवशेष अधिनियम १९६० च्या
अधिनियमाच्या १५ व्या कलमातील तरतूदीवर
आधारीत असलेली पुरातत्त्व विभागातंर्गत
"महाराष्ट्र वैभव- राज्य संरक्षित स्मारक संगोपन
योजना" सुरु करणे.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- मवैयो-२००५/प्र.क्र.१०७/सां.का.३**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक :- २ फेब्रुवारी, २००७**

<u>प्रस्तावना</u> महाराष्ट्र राज्याला पुरातत्वीय अवशेष, स्मारके, हस्तलिखिते, पारंपारिक कला व इतर सांस्कृतिक परंपरांच्या स्वरुपात समृध्द असा वारसा आहे. आपण आपल्या भूतकाळाच्या वैभवाचे प्रतिक असलेल्या स्मारकांचे जतन व पुनरुज्जीवन करुन सध्याच्या व पुढच्या पिढीला आपल्या संस्कृतीची आणि परंपरेची ओळख करुन देणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र प्राचीन स्मारके, पुराणवस्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम १९६० च्या अधिनियमाच्या १५ व्या कलमामध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे:-

" संचालकास, संरक्षित स्मारक सुस्थितीत राखण्यासाठी स्वेच्छेने दिलेल्या देणग्या स्वेच्छेने स्विकारण्याचा अधिकार आहे आणि अशा प्रकारे त्यांच्याकडे आलेल्या कोणत्याही निधीची दिलेली व्यवस्था लावण्याबाबत व तो कामी लावण्याबाबत आदेश देण्याचा अधिकार आहे परंतु या कलमान्वये दिलेली कोणतीही देणगी ती ज्या कारणासाठी देण्यात आली होती त्या कारणा व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी तिचा उपयोग करता कामा नये."

वरील तरतूद जनतेसमोर एखाद्या योजनेच्या स्वरुपात सादर केल्यास स्मारकाच्या जतन/दुरुस्ती कार्याला जनतेचा मोठा हातभार लागेल ही बाब विचारात घेऊन पुरातत्व विभागाअंतर्गत राज्यात उपलब्ध असलेल्या विविध स्वरुपाच्या उदंड वारशाचे जतन करण्याच्या दृष्टीने "महाराष्ट्र वैभव-राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजना" प्रस्तावित केली आहे.

<u>शासन निर्णय :-</u> राज्याच्या सांस्कृतिक आणि कलेच्या उदंड वारशाचे जतन करण्यासाठी महाराष्ट्र प्राचीन स्मारके, पुराणवस्तुशास्त्र अवशेष अधिनियम, १९६० च्या १५ व्या कलमातील तरतूदीवर आधारीत असलेली पुरातत्त्व विभागाअतंर्गत "महाराष्ट्र वैभव- राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजना" या शासन निर्णयान्वये अंमलात आणण्यात येत आहे.

राज्य संरक्षित स्मारकांचे जतन आणि संवर्धन करु इच्छिणा-या संस्थांना आणि व्यक्तींना कॉर्पोरेट क्षेत्रांना, विश्वस्त मंडळांना आणि याविषयी अभ्यास असणाऱ्या व्यक्तींना या योजनेत सहभागी करुन घेता येईल. तसेच जतन आणि संवर्धनाच्या कामामध्ये खाजगी सहभागाला उत्तेजन देऊन मिळालेला निधी अधिक प्रभावीपणे वापरता येईल. या योजनेमुळे राज्य शासनाच्या अखत्यारितील संरक्षित स्मारकांच्या देखभालीच्या आणि जतनाच्या कार्यामध्ये जनतेच्या सहभागात वाढ होईल.

या योजनेचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे:-

**१) योजनेची उद्दिष्टे:-**

अ) राज्य संरक्षित स्मारकांच्या जतन दुरुस्ती, देखभाल, सुशोभिकरण व विकास कामासाठी सार्वजनिक सहभाग मिळविणे व वारसा जतनाची जाणीव त्याचे महत्व जनमानसात रुजविणे, व्यावहारीक पातळीवर विविध संस्थांना/ व्यक्तींना स्मारकांचे पालकत्व घेण्यास प्रोत्साहन देणे.

ब) जतनदुरुस्तीचे कौशल्य व कला याकरीता खाजगी क्षेत्रातील जतनदुरुस्तीच्या कौशल्याचा, ज्ञानाचा व अनुभवाचा या कामासाठी उपयोग करुन घेणे.

क) या स्मारकांची योग्य देखभाल आणि निगा राखण्यासाठी आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करुन देणे.

ड) अशा स्मारकांच्या जतन कार्यात सामान्य जनतेला रस निर्माण करण्यासाठी जनतेचा सहभाग घेऊन आपल्या समृध्द वारशाबाबत आणि त्याच्या जपणुकीबाबत जनतेत नवी जाणीव निर्माण करणे.

**२) योजनेची वैशिष्टये:-**

अ) या योजनेनुसार कोणत्याही संस्थेला, या विषयाचा अभ्यास असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला व संघटनेला एखाद्या स्मारकाचे संगोपन करण्यासाठी त्याचे पालकत्व स्वीकारुन त्या पालकत्व कालावधीत त्या स्मारकाच्या जतन, दुरुस्ती व देखभालीचा सर्व खर्च सोसून सांस्कृतिक संवर्धनाच्या कार्याला हातभार लावता येईल.

ब) ही संपूर्ण योजना आता महाराष्ट्र प्राचीन स्मारके पुराणवस्तुशास्त्र विषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० या अधिनियमातील कलम १५ मधील तरतूदीअन्वये तयार करण्यात आली आहे आणि तिची अंमलबजावणी याच अधिनियमाच्या ३० व्या कलमातील तरतूदी प्रमाणे नियुक्त केलेल्या सल्लागार मंडळाच्या सल्ला विचारात घेवून संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये यांचे मार्फत करण्यात येईल.

(क) या योजनेत सहभागी होण्यासाठी राज्य संरक्षित स्मारकांच्या यादीमधून 'संगोपनार्थ किंवा पालकत्व स्वीकारण्याकरता' स्मारकाची निवड करता येईल व या स्मारकाच्या संगोपनार्थ पाच वर्षाकरता त्याचे पालकत्व घेता येईल. या पालकत्व-कालावधीत या स्मारकाच्या जतन दुरुस्तीची, सुशोभीकरणाची व देखभालीची संपूर्ण जबाबदारी पालकत्व घेणाऱ्या

संस्थेवर/व्यक्तीवर राहील. असे पालकत्व घेताना पालकत्व घेणाऱ्या संस्थेला/व्यक्तीला संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, यांच्याशी म्हणजेच पर्यायाने शासनाशी करार करावा लागेल व या करारातील शर्ती, स्मारकाचे पालकत्व घेणाऱ्यांवर बंधनकारक राहतील.

ड) पुरातत्व विभागातंर्गत राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजने करिता नियुक्त केलेल्या सल्लागार मंडळाच्या सल्यानुसार पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय किंवा या संचालनालयाने / सल्लागार मंडळाने नियुक्त केलेली पालक व्यक्ती/ पालक संस्था ही अशा प्रकारे पालकत्व घेतलेल्या स्मारकाच्या जतन दुरुस्तीची कामे करतील. स्मारकाची जतन, देखभाल/दुरुस्ती सुशोभीकरण इत्यादी पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालयाने सुचवल्याप्रमाणेच व संचालनालयाच्या देखरेखीखालीच करावी लागेल.

ई) कामे जलद गतीने व्हावीत यासाठी पर्यवेक्षण करण्यासाठी सल्लागार मंडळाने नियुक्त केलेली एक पर्यवेक्षण समिती असेल. या समितीत ज्येष्ठ शासकीय अधिकारी, खाजगी क्षेत्रतील, अशासकीय संघटनांमधील आणि प्रत्यक्ष काम करणा-या व्यक्ती / संस्थेचे प्रतिनिधी असतील.

फ) पालकत्व कालावधीत कराराच्या अटी व शर्तीनुसार करण्यात येणाऱ्या कामाच्या प्रगतीचा / कार्यवाहीचा नियतकालीक आढावा पर्यवेक्षण समिती आणि सल्लागार मंडळाकडून घेण्यात येईल.

(ग) महाराष्ट्र स्मारक संगोपन योजनेद्वारे पुरातत्व संचालनालय महाराष्ट्रातील संरक्षित स्मारकांच्या जतनदुरुस्तीचे प्रकल्प राबविण्यासाठी पुढाकार घेऊन अशा प्रकल्पांची अंमलबजावणी करेल. ही कामे स्मारक दत्तक योजनेला मिळालेल्या निधीमधून करण्यात येतील.

<u>स्मारकाच्या संगोपनार्थ स्मारकाचे पालकत्व घेणाऱ्यांची कर्तव्ये व कार्ये :</u>

अ) या योजनेअंतर्गत स्मारकाचे पालकत्व देण्यात आलेले असले तरी ते तात्पुरत्या स्वरुपात आणि करार कालावधीपुरते मर्यादित राहिल. मात्र मूळ मालकी शासनाचीच राहील.

ब) स्मारकाची स्वच्छता व निगा राखणे व देखभाल करणे ही जबाबदारी पूर्णतः स्मारकाचे पालकत्व घेणाऱ्याची असेल. ही जबाबदारी कशा तऱ्हेने पार पाडावी याबाबतचे संचालनालयाचे निकष पालकत्व घेणाऱ्या संस्थेस/व्यक्तीस बंधनकारक राहतील.

क) पर्यटकांसाठी वाहनतळ, प्रसाधनगृहे, संपर्क यंत्रणेच्या सुविधा पुरवणे ही जबाबदारी पालकत्व घेणाऱ्यावर राहील. अशा सुविधा पुरवतांना त्याची योजना व वाहनतळ, प्रसाधनगृहे इत्यादींची नेमकी स्थाने यांचा नकाशा संचालनालयास सादर करुन त्यास संचालनालयाची मान्यता घ्यावी लागेल.

ड) प्रकाशध्वनी कार्यक्रम व तत्सम अन्य कार्यक्रम करणे, दुर्मिळ दस्तऐवजांचे प्रदर्शन भरवणे आणि पर्यटकांसाठी मागदर्शकांची नियुक्ती करणे ही कामे पालकत्व घेणाऱ्या संस्था/व्यक्तिंनी करणे अपेक्षित आहे. मात्र त्याबाबत संचालक, पुरातत्व विभाग यांची आणि शासनाची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहिल तसेच त्याबाबतचा संपूर्ण खर्च पालकत्व घेतलेल्या व्यक्ति/संस्थांना करावा लागेल.



H\1956-2

इ) स्मारकाचे अतिक्रमणापासून संरक्षण करण्यासाठी खाजगी सुरक्षा रक्षक नेमणे ही जबाबदारी पालकत्व घेणाऱ्या व्यक्ती, संस्थांची राहिल.

फ) स्मारकाच्या लाईट, पाणी इत्यादींची देयके पालकत्व घेणाऱ्या व्यक्ति, संस्थांना अदा करावी लागतील.

ग) स्मारकाची जतन-दुरुस्ती योजनेच्या वैशिष्ट मधील (ड) अन्वये करणे ही जबाबदारी पालकत्व घेतलेल्या व्यक्ती/संस्थांची राहील.

**पुरातत्व विभागातंर्गत राज्य संरक्षित स्मारक संगोपनार्थ स्मारकाचे पालकत्व घेणा-यास मिळणारे लाभ.**

अ) पुरातत्व विभागातंर्गत राज्य संरक्षित स्मारक संगोपनार्थ योजनातंर्गत स्मारकाचे पालकत्व घेणा-या संस्थेला / व्यक्तीला हे स्मारक आपल्या उद्योगाच्या जाहिरातीकरिता प्रतीकचिन्ह म्हणून वापरण्याचा अधिकार राहील.

ब) त्याचप्रमाणे स्मारकाचे पालकत्व घेणा-या संस्थेला / व्यक्तीला तिचा या जतन कामातील सहभाग विशद करणारा फलक स्मारकात किंवा स्मारकाच्या आवारात , स्मारकाच्या मूळ ठेवणीशी विसंगत होणार नाही अशा प्रकारे बसविता येईल. मात्र फलक लावावयाच्या जागेला व त्यातील मसुद्याला संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय यांची मान्यता घ्यावी लागेल. तसेच असा फलक हा पालकत्व कालावधीसाठी असेल.

क) पालकत्व कालावधीत या स्मारकाचे छायाचित्रण व चित्रीकरण करण्याचा व या छायाचित्रांचा कॅलेंडर, डाय-या इ. प्रकाशनांमध्ये उपयोग करण्याचा पूर्ण अधिकार राहील.

इ) स्मारकाचे पालकत्व घेणा-या संस्थेला / व्यक्तीला पालकत्व घेणाऱ्या व्यक्ती/संस्थांना शासनाच्या संमतीने ठरविलेले किमान प्रवेश शुल्क लावून त्या वास्तुच्या देखभालीचा खर्च वसूल करता येईल. प्रवेश शुल्काची रक्कम ठरविणे, त्याची वसूली करणे, त्याचा हिशेब ठेवणे व विहित मुदतीच्या आत हिशेब शासनास सादर करणे इत्यादी बाबी शासनाच्या सल्ल्याने ठरविण्यात याव्यात.

<u>राज्य सल्लागार मंडळ</u>

महाराष्ट्रातील 'राज्य संरक्षित स्मारकांच्या' जतन-दुरुस्ती कामाबाबत शासनाला सल्ला देणे हे राज्य सल्लागार मंडळाचे एक महत्वाचे कार्य आहे. साहजिकच यात महाराष्ट्र वैभव : स्मारक संगोपन योजनांतर्गत होणाऱ्या जतन-दुरुस्ती कामांबाबत सल्ला देण्याच्या कार्याचाही समावेश होतो. या योजनेची अंमलबजावणी करताना या मंडळाचा सल्ला विचारात घेण्यात येईल. हे मंडळ महाराष्ट्र शासन नेमेल व तसे नेमल्याची अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ते अंमलात येईल.

**उप समिती : स्वरुप व व्याप्ती :**

या योजनेमध्ये असलेल्या एखाद्या विशिष्ट राज्य संरक्षित स्मारकाच्या जतन-दुरुस्तीच्या देखरेखीचे काम पाहता यावे यासाठी संचालनालयांस आवश्यकता भासल्यास, सल्लागार मंडळाचा सल्ला विचारात घेऊन, संचालनालय एक उप समिती नेमेल व या उप समितीच्या अधिकारांची व्याप्ती फक्त संबंधित विशिष्ट स्मारकापुरतीच मर्यादित असेल. स्मारकाच्या जतन दुरुस्तीचे काम संपताच ही समिती आपोआप बरखास्त होईल.

सदर योजनेस वित्त विभागाने त्यांच्या अनौ.संदर्भ क्र.७१९/व्यव-१४, दिनांक १९.११.२००५ अन्वये सहमती दिली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

मीना जोशी

( मीना जोशी )
उप सचिव, सांस्कृतिक कार्य

प्रत:-
संचालक, पुरातत्वशास्त्र व वस्तुसंग्रहालये महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहाय्यक संचालक, पुरातत्वशास्त्र, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद, पुणे, रत्नागिरी, नाशिक, नागपूर
महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता (मुंबई / नागपूर)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
मुख्य कार्यकारी अधिकारी सर्व जिल्हा परिषदा
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, का.सां.का.३

H\1956 - 3

Translated from Marathi

Starting new "Maharashtra Vaibhav - State Protected Monuments Conservation Scheme" under the Archeology Department under the provisos of Section 15 of Maharashtra Ancient Monuments, Archeological Sites and Remains Act, 1960.

---

GOVERNMENT OF MAHARASHTRA
TOURISM AND CULTURL AFFAIRS DEPARTMENT
Government Decision No. MVY-2005/ Pr.Kr.107/S.K.3
Mantralaya Annexe Building, Mumbai 400032
Date: 2nd February, 2007

Preface :

The State of Maharashtra is having a rich heritage in form of archeological remains, monuments, handwritings, traditional arts and other cultural traditions. It is essential that we should make introduction of our culture and traditions to the present and coming generations by preserving and reviving the monuments which are symbols of our past glory.

In Section 15 of the Maharashtra Ancient Monuments, Archeological Sites and Remains Act, 1960, it has been provided as under :

"The Directors are having the power for accepting the willingly given donations for maintaining the protected monuments in good condition. And is having the power for giving orders for making given arrangement of any funds received by them and for utilizing the same for the works. But, any donation given under this column, should not be used for any other purposes other than the purpose for which the same was given."

If the above provision is presented before the people in form of a scheme, there will be big hand of the people for the preservation/ repairs of the monuments, taking this fact into consideration, and in view of preserving the abundant heritage of different nature available in the State under the Archeology Department, "Maharshtra Vailbhav – State Protected Monuments Conservation Scheme" has been proposed.

Government Decision : For the purpose of preserving the abundant heritage of culture and arts of the State, the "Maharashtra Vaibhav – State Protected Monuments Conservation Scheme" the Archeology Department, based on the provisions of Section 15 of the Maharashtra Ancient Monuments, Archeological Sites and Remains Act, 1960 is being bought into implementation vide this Government Decision.

The Societies and Persons, Corporate field, Trustees and persons studying in this matter who are willing for preservation and growth of State Protected monuments can take part in this scheme. Similarly the funds received by motivating private participation in the preservation and growth works, can be used more effectively. Due to this scheme, there will be increase in public participation in the works of maintenance and preservation of the protected monuments under the control of the Government.

The nature of this scheme is as under:

1. Objects of the Scheme:

a) To obtain public participation for the works of preservation, repairs, maintenance, renovation and development of the State protected monuments and to inculcate awareness of the heritage preservation and its importance in the minds of the people, to encourage different societies / persons at business level, for taking the guardianship of the Monument

b) To get the skill, knowledge and of preservation, repairs from the private sector, and use for the purpose of skill and arts of preservation & repairs.

c) To provide the facilities required for proper maintenance and supervision of these monuments.

d) To create new awareness in the public about our rich heritage and its preservation, by taking the participation of public, for the purpose of creating interest in the minds of general public in preservation works of such monuments.

2) Features of the Scheme:

a) As per this scheme, any Firm, any person having study of this subject, and organization can contribute for works of cultural growth by accepting its guardianship of certain monument for the purpose of Conservation the same and by bearing all the expenditure of preservation , repairs and maintenance of that monument during the period of the said guardianship.

(b) This complete scheme has been prepared now under the provisions of Section 15 of the Maharashtra Ancient Monuments Archeological Sites and Remains Act, 1960 and the implementation of the same will be done through the Director, and Museums, by taking into consideration advice of the Advisory Committee appointed as per the provisions of Section 30 of the same Act.

c) For the purpose of becoming participant in this scheme, selection of moments "for the purpose of Conservation or accepting guardianship' can be made from the list of Protected Monuments and for the purpose of Conservation, the guardianship of the same can be taken for five years. During this guardianship period, the entire responsibility preservation repairs, beautification and maintenance of this monument will be of the Firm/person taking the guardianship. While taking such guardianship, the Firm/person taking the guardianship will have to make the agreement with the Director, Archeology

and Museum Directorate, that means alternately with the Government.

d) As per the advice of the Advisory Committee appointed for the Protected Monuments Conservation Scheme under the Archeology Department, the Archeology and Museum Directorate or the guardian person/ guardian Firm appointed by this Directorate/ Advisory Committee will do the works of preservation repairs of the monuments of which such guardian ship has been taken. The preservation, maintenance/repairs, beautification etc. of the monuments will have to be done only as suggested by the Archeology and Museum Directorate and under the supervision of the of the Directorate.

e) There will be one Supervision Committee appointed by the Advisory Committee for making the supervision, for the purpose of having the works done speedily. There will be the Senior Government Officer, the persons of private field, non-Government organizations and actually working persons/ Firm's representatives in this Committee.

f) The periodical review of the progress of work/ process being done as per the terms and conditions of the Agreement during the guardianship period will be taken by the Supervision Committee and Advisory Board.

g) Through the Maharashtra Monuments Conservation Scheme, the Archeology Directorate will take initiation for implementation the project of the preservation, repairs of protected monuments in Maharashtra and will make implementation of such projects. These works will be done from the funds received to the Monuments Adoption Scheme.

Duties and works of those taking guardianship of Monuments for Conservation of the monuments:

a) Though the guardianship of the monument has been given under this Scheme, the same will be valid temporarily and limited upto the Agreement period. But, the original ownership will be of the Government only.

b) The responsibility monuments' cleanness, supervision and maintenance will be completely of those taking the guardianship of the monument. The criterion of the Directorate about the manner in which these responsibilities are to be carried out, will be binding on the Firm/person taking the guardianship.

c) The responsibility of providing Parking lot, toilets, facilities of contact machinery for the purpose of tourists will be of those taking the guardianship. While providing such facilities, its plan and the actual sites of parking lot and toilets etc. will have to be submitted to the Directorate and their permissions will have to be taken for the same.

d) To make Lights-Sound programs and such other programmers, to hold exhibitions of rare documents, and to appointment guides for the tourists etc. works are expected to be done by the Firm/person taking the guardianship. But, in that respect, it will be necessary to take the prior permission of the Director, Archeology Department and the Government , and the entire expenditure will have to be made by the person/Firm taking the guardianship.

e) The responsibility of appointing Private Security Guards for protection of the monuments from encroachments will be of the Firm/person taking the guardianship.

f) The bills for electricity, water etc. of the Monument will have to be paid by the Firm/person taking the guardianship.

g) The responsibility of doing the preservation-repairs of the monuments vide (d) of Features of the scheme will be of the Firm/person taking the guardianship.

The benefits to be received by those taking guardianship of the Monuments for the purpose of Conservation the State Protected Monuments under Archeology Department :

a) The Firm/ person taking the guardianship of the monuments under the scheme for the purpose of conserving the State Protected monuments under Archeology Department will have the right of using the monument as the symbol for advertisement of their business.

b) In the same way, the Firm/ person taking the guardianship of the monuments can fix a Board explaining the participation in its preservation works in the Monument or in the compound of the Monument, in such way so that it will not be inconsistent with maintaining the originality of the Monuments. But, the approval of the Archeology and Museum Directorate will have to be taken to the place where the Board to be fixed and for the draft of the same. Similarly such boards will be for the period of the guardianship.

c) They will have the complete right for taking photography and shooting of this Monuments, and for making use of these photographs for Calendar, Diaries etc. publications, during the period of the guardianship.

d) The firm/ person taking the guardianship of the monument can recover the expenditure of the repairs of the structure, by charging minimum entry fees as

fixed by the Committee of the Government. The matters of fixing the amount of entry fees, recovery of the same, maintaining account of the same and submitting the accounts to the Government within the prescribed period, etc. maybe fixed as per the advice of the Government.

State Advisory Committee:

It is an important work of the State Advisory Committee to give advice to the Government in respect of the preservation-repair works of the State Protected Monuments in the State. Naturally, the process of giving advice about the preservation – repairs works being held under the Maharashtra Vaibhav Monuments Conservation Scheme is also included in the same. While making implementation of this scheme, the advice of this Committee will be taken into consideration. This Committee will be appointed by the Government of Maharashtra and the same will come into effect from the date on which the notification of such appointment made is published in the Gazette of the Government of Maharashtra.

Sub-Committee: Nature and Scope:

For the purpose of looking after the works of supervision of the Preservation- repairs of the certain specific State Protected Monuments in this Scheme, if felt necessary by the Directorate, the Directorate will appoint one Sub-Committee by taking the advice of the Advisory Committee into consideration and the scope of the powers of this Sub-Committee will be limited only upto the concerned specific monument. The Sub-committee will be dissolved immediately on completion of the preservation-repair works of the Monument.

The Finance Department has given its consent to this Scheme vide their formal reference No. 719/Vya.14 dated 19.11.2005.

By Order and in the name of the Governor of Maharashtra.

Sd/-
(Meena Joshi)
Dy. Secretary, Cultural Affairs.

Copy to :

Director, Archeology and Museums, Maharashtra State, Mumbai.

Assistant Directorate, Archeology, Regional Office, Aurangabad, Pune, Ratnagiri, Nashik, Nagpur.

Accountant General, Accounts and Permissibility (Mumbai / Nagpur).

Pay and Accounts Officer, Mumbai.

Resident Accounts Officer, Mumbai.

Finance Department, Mantralaya, Mumbai.

All Divisional Commissioners.

All District Collectors.

Chief Executive Officers, All Jilla Parishads.

All Desks of Toursim and Cultural Affairs Department.

Selected File, D.C.A. 3.

Translated from Marathi

ARCHEOLOGY & MUSEUMS DIRECTORATE
GOVERNMENT OF MAHARASHTRA
St. George Killa, St. George Hospital Compound, Near Chhatrapati Shivaji Terminus,
Mumbai 400001.

OW No. Tech./2014/1341 Date: 12 Jul. 2014

To,
The Dy. Secretary,
Tourism & Cultural Affairs Dept.
Mantralaya, Mumbai.

Sub: Regarding giving approval for the Draft of the Mutual Agreement to be made in respect of giving Naldurg Killa under Monuments Conservation Scheme to the firm Unity Multicons, under Maharashtra Vaibhav State Protected Monuments Conservation Scheme.

Ref: Letter No. MVY 1023/Pr.Kr.240/C.A. 3 dated 5.4.2014 of the Desk Officer, Tourism and Cultural Affairs Department.

-----

Sir,

With reference to the above referred subject, the Committee has given approval for giving the Naldurg Killa to the firm, Unity Multicons under Maharashtra Vaibhav State Protected Monuments Conservation Scheme for the purpose of Conservation under the Monuments Conservation scheme and has taken the decision for making agreement between the Government and the firm.

Accordingly, the firm Unity Mulitcons Pvt.Ltd., Solapur has submitted the Draft of the Mutual Agreement to the Directorate. Similarly, the said firm has included the suggestions suggested by the Directorate in the Draft of

the Mutual Agreement. The Xerox copy of the letter sent by the firm is enclosed with this letter.

Shri Sanjay Krishnaji Patil Director, Archeology and Museum Directorate, Maharashtra State on behalf of the Government and Shri Kaufill Maulavi, Managing Director, Unity Multicons Pvt. Ltd., Solapur, on behalf of the Unity Multicons Pvt. Ltd., Solapur, will be signing the said Mutual Agreement to be made under Maharashtra Vaibhav State Protected Monuments Conservation Scheme.

Encl: As above.

Sd/-
(Dr. Maya Patil)
Director
Archeology & Museums,
Maharashtra State.